| MHLA050028602025 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ०७/२०२५<br>साहेबराव वि. शासन |
|---|---|

## नि.क्र.१ खालील आदेश

**०१.** सदरकामी भुसंपादन निर्देशन अर्ज क्र.४४४/२००१ हा साहेबराव तुळशीराम शेळके याच्या मालकीच्या तळेगाव, ता. अहमदपूर येथील गट क्र.६६/२-४ व ६८/२-४ या जमिनींच्या संपादनाच्या वाढीव मोबदल्यासाठी दाखल होवून निकाली झाला. परंतु, त्यात टंकलेखनातील चुकीने साहेबराव या शब्दाऐवजी शेषेराव हा शब्द त्याच्या नावाच्या ठिकाणी लिहिण्यात आला होता. शेषेराव या शब्दाऐवजी साहेबराव हा शब्द निवाडयात लिहिण्यात यावा, यासाठी प्रस्तुत अर्ज आहे.

**०२.** जाबदार क्र.१ व २ यांना नोटीस बजावणी होवून त्यांनी आपले म्हणणे दिले नाही.

**०३.** कागदपत्रे पाहता असे दिसते की, शेषेराव तुळशीराम शेळके या नावाने भूसंपादन अर्ज क्र.४४४/२००१ दाखल झाला होता. त्याचा निकाल होवून दि.०४/०४/२००८ रोजी खर्चाचा आकडा तयार झाला. त्यावर अर्जदाराच्या वतीने त्याचे वकिलांची सही आहे. सदर प्रकरण मुळचे १९९३ साली दाखल झाले होते. तेंव्हापासून निकाल तारखेपर्यंत ही चूक अर्जदाराच्या लक्षात आली नाही का, याचे स्पष्टीकरण अर्जात नाही.

**०४.** ई स्टेटमेंट पाहता त्याच्यामध्ये साहेबराव तुळशीराम याच्या नावाने तळेगाव येथील जमीन क्र. ६६/२-४ व ६८/२-४ या जमिनी दिसत असून त्यांचे संपादन शासनाच्या लाभात झालेले आहे. साहेबराव हा दि.११/०४/२०२१ रोजी मयत झाल्याचा दाखला उपलब्ध आहे. निवाडयामध्ये वर नमूद दोनही जमिनी संपादीत झाल्याचे दिसते.

**०५.** शेषेराव तुळशीराम शेळके या व्यक्तीच्या नावे वर नमुद दोन्ही जमिनी मधील संपादीत क्षेत्र नव्हते अशा आशयाचे शपथपत्र अर्जदाराने या प्रकरणी

दाखल करावे. सदर निवाडयास दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५२ प्रमाणे दुरुस्ती करण्यासाठी, असे शपथपत्र दाखल झाल्यानंतर परवानगी देण्यात आली आहे, असे समजण्याचे आहे. या प्रकरणी उशीर केला असल्याने अर्जदार यांना रक्कम रुपये ५,०००/- इतका खर्च शासन दप्तरी जमा करण्याचा आदेश देण्यात येतो. या अटींवर अर्ज मंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

**दिनांक १३/०४/२०२६.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**